14 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रसिकराज पुरस्काराने जबाबदारी वाढली

## सुधीर पोटे : देवल क्लब, मुजुमदार परिवारातर्फे पुरस्कार वितरण

कोल्हापूर, ता. १३ : "रसिकराज पुरस्काराने माझ्यावरील संगीत विषयक जबाबदारी वाढली आहे. यापुढे संगीत क्षेत्रात झोकून देऊन काम करण्याची ऊर्जा या पुरस्काराने दिली," असे मत शास्त्रीय गायक सुधीर पोटे यांनी आज येथे व्यक्त केले. गायन समाज देवल क्लब व मुजुमदार परिवारातर्फे श्री पोटे यांना सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दिला, यावेळी ते बोलत होते. शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. श्री. पोटे यांनी दीर्घकाळ शास्त्रीय गाण सेवा केली. शास्त्रीय संगीत विषयक नव्यापिढीला मार्गदर्शन ते करतात, त्यांच्या सेवेची दखल घेऊन त्यांना पुरस्कार दिला.

डॉ. शिर्के म्हणाले, " शास्त्रीय संगीत मानवी जगण्याला ऊर्जा देणारी कला आहे, संगीता विषयीची जाण असलेले कलावंत घडणे आवश्यक आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठ व देवल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने संगीत विषय उपक्रम हाती घेण्यासाठी प्रयत्न केले जातील." सुधीर पोटे यांच्या आई नलिनी पोटे यांचाही विशेष सत्कार झाला. देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांनी देवल क्लबच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. यावेळी सचिन पुरोहीत, राजेंद्र पित्रे, श्रीकांत डिग्रजकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्कार पं. सुधीर पोटे यांना प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत प्रताप मुजुमदार, अनुपमा मुजुमदार, व्ही. बी. पाटील, सचिन पुरोहित, आदी**

### सुरेल संगीत मैफील रंगली

पुरस्कार वितरण समारंभानंतर 'कानडा कापिला' या सुरेल संगीत मैफल रंगली. यात सुधीर पोटे यांनी काफि कानडा, कौशी कानडा, अडाणा हुसेनी कानडा या संगीत शैलीचे नेटके सादरीकरण केले. श्री पोटे यांनी रागांची गुण वैशिष्ट्ये सांगितली. विनोद ठाकूर देसाई, गौरी पाध्ये, प्रशांत देसाई, अमित साळोखे यांनी साथ संगत केली.

14 FEB 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुजुमदार पुरस्कारामुळे जबाबदारी वाढली

## ज्येष्ठ गायक सुधीर पोटे यांचे मत : सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्कार मिळाल्याने अभिजात शास्त्रीय संगीतामध्ये आणखी चांगले काम करण्याची जबाबदारी वाढली आहे, अशी कृतज्ञता ज्येष्ठ गायक सुधीर पोटे यांनी रविवारी व्यक्त केली.

गायन समाज देवल क्लबतर्फे आयोजित श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार पुरस्कार स्वीकारल्यानंतर ते बोलत होते. मान्यवरांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देण्यात आला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मुजुमदार कुटुंबीयांचे प्रतिनिधी अनुपमा मुजुमदार, देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. राम गणेश गडकरी सभागृहात कार्यक्रम झाला.



कोल्हापुरातील राम गणेश गडकरी हॉलमध्ये रविवारी श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्कार ज्येष्ठ गायक सुधीर पोटे यांना देण्यात आला. यावेळी डावीकडून अनुपमा मुजुमदार, डॉ. डी. टी. शिर्के, व्ही. बी. पाटील, नलिनी पोटे यांची उपस्थिती होती. (फोटो : नसीर अत्तार)

पोटे म्हणाले, देवल क्लबमध्ये गायनाचे शिक्षण घेतले. या संस्थेशी अनेक वर्षांपासून जिव्हाळ्याचे संबंध राहिले. आतापर्यंत गायक म्हणून केलेल्या कामगिरीत कुटुंबीय, शेजारी, मी शिकलेली शाळा, कॉलेजचा वाटा मोठा आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठ नेहमी संगीत, कला, साहित्य, गायनास प्रोत्साहन देत राहिले आहे. यापुढील काळातही देवल क्लब आणि विद्यापीठातर्फे विविध उपक्रम राबविता येतील.

अध्यक्ष पाटील म्हणाले, पोटे यांचे गायन क्षेत्रातील काम उत्कृष्ट आहे. त्यांना त्यांच्या आईची चांगली साथ मिळाली. यावेळी अनुपमा मुजुमदार यांनी मनोगत व्यक्त केले.माहेश्वरी गोखले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आशुतोष देशपांडे यांनी आभार मानले. पुरस्कार वितरणानंतर पोटे यांची संकल्पना, निवेदन असलेला 'कानडा काफिला' हा कार्यक्रम सादर झाला.

### आईसमोर सन्मान

पंचाण्णव वर्षांच्या आई नलिनी पोटे यांच्या समोर मुलगा सुधीर यांना पुरस्कार देऊन सन्मान होणे विशेष असल्याचे आयोजकांनी सांगितले. मुलास पुरस्कार दिल्याबद्दल नलिनी यांनीही पोटे कुटुंबीयांना आनंद झाल्याचे स्पष्ट केले.

पुण्यनगरी



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पं. सुधीर पोटे यांना रसिकराज पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी पदाधिकारी. (छाया : तय्यब अली)

# रसिकराज पुरस्काराने पंडित पोटे यांचा गौरव

## देवल क्लबतर्फे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गायन समाज देवल क्लब आणि मुजुमदार कुटुंबीयांच्या वतीने रविवारी गडकरी हॉल येथे प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. सुधीर पोटे यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन पोटे यांचा गौरव करण्यात आला. स्वागत अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन माहेश्वरी गोखले यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांना आबासाहेब मुजुमदार यांच्या कार्यकर्तृत्वाची त्यानंतर देवल क्लबच्या कार्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते आणि अनुपमा मुजुमदार, बाबासाहेब देशपांडे यांच्या उपस्थितीत पं. पोटे यांचा रसिकराज पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अखेरच्या सत्रात पं. पोटे यांनी संकल्पित केलेल्या कानडा काफिला या संगीत कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये विनोद ठाकूरदेसाई, गौरी पाध्ये, प्रशांत देसाई, अमित साळोखे या कलाकारांनी काफी कानडा, कौशी कानडा, अडाणा हुसेनी कानडा अशा संगीत प्रकारांचे सादरीकरण केले. आभार आशुतोष देशपांडे यांनी केले.

यावेळी सचिन पुरोहित, राजेंद्र पित्रे, श्रीकांत डिग्रजकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

14 FEB 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# द्वितीय, तृतीय वर्षाच्या आजपासून परीक्षा

## ऑनलाईन स्वरूप : कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील २ लाख २० हजार विद्यार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या द्वितीय, तृतीय वर्षाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ आज (सोमवार)पासून होणार आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील २ लाख २० हजार विद्यार्थी या परीक्षा देणार आहेत. ऑनलाईन स्वरूपात रोज विविध चार सत्रांमध्ये परीक्षा होईल.

पारंपरिक अभ्यासक्रमाच्या पदवी प्रथम वर्षाच्या (प्रथम, द्वितीय सत्र) सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय पातळीवर, तर डिप्लोमा, पी. जी. डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सच्या परीक्षा महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभाग पातळीवर ऑनलाईन स्वरूपात सध्या सुरू असून, त्या मंगळवार (दि. १५)पर्यंत चालणार आहेत.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

६६४ हिवाळी सत्रात होणाऱ्या परीक्षा

२७६ संलग्नित महाविद्यालय

३४ विद्यापीठातील अधिविभाग

२.४० लाख एकूण परीक्षार्थी

> या परीक्षा घेण्याची तयारी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून पूर्ण झाली आहे. यासाठीच्या आवश्यक त्या सूचना महाविद्यालय अधिविभागांना केल्या आहेत. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण आल्यास त्यांनी परीक्षा मंडळाशी संपर्क साधावा.
>
> **- गजानन पळसे**, प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सोमवारपासून सुरू होणार आहेत. औषधनिर्माणशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र, वास्तुनिर्माण, अभियांत्रिकी या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (प्रथम, द्वितीय वर्ष नवीन प्रवेश वगळून) परीक्षा क्लस्टर पातळीवर घेण्यात येतील. उर्वरित परीक्षा घेण्याचे नियोजन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे. सकाळी साडेदहा ते साडेअकरा, दुपारी साडेबारा ते दीड, दुपारी अडीच ते साडेतीन, सायंकाळी साडेचार ते साडेपाच अशा चार सत्रांमध्ये ऑनलाईन स्वरूपात परीक्षा होईल. या परीक्षेसाठी ५० गुणांचे संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित प्रत्येकी दोन गुणांचे २५ प्रश्न असतील. बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश असलेला पेपर सोडविण्यासाठी एक तासाची वेळ असणार आहे.

पुढारी

# विद्यापीठ ऑनलाईन परीक्षा आजपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठअतंर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ हिवाळी सत्रातील ऑनलाईन परीक्षांना आज (सोमवार) पासून सुरुवात होणार आहे. या सत्रात ६६२ परीक्षांसाठी १ लाख २८ हजार विद्यार्थी बसणार आहेत. पहिल्या दिवशी बीटेक विषयाची परीक्षा होणार असून सुमारे ५०० विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.

बी.कॉम, बँक मॅनेजमेंट, बी.एस्सी, अनिमेशन, बीएसस्सी शुगर टेक, बी.एस्सी. बायोटेक, बी. कॉम, बिझनेस मॅनेजमेंट आदी विषयांच्या परीक्षा मंगळवारपासून सुरू होणार आहेत. या परीक्षा १४ फेब्रुवारी ते १५ मार्च या कालावधीत होतील. ऑनलाईन परीक्षेसाठी तांत्रिक अडचण आल्यास विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील ऑनलाईन क्रमांकाशी संपर्क साधावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी केले आहे. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी भाग एकच्या आणि क्लस्टर पद्धतीच्या परीक्षांना सोमवार १४ पासून सुरुवात होणार आहे. ३०२ परीक्षांसाठी जवळपास १ लाख विद्यार्थी बसणार आहेत.